माधव पाठक लिंगणभट एकोंडीकर
फलंभट माहेकर

यांशी बोलाऊन पुसिले कीं धर्माधिकरण आमचे ह्मणऊन बोलतां. तरी धर्माधिकरण जोईसीयांचे कैसे ते सांगणे ह्मणऊन सभासदीं पुसिलें त्यावरी ते बोलिले जें आपणास धारादत्त पांच वृत्ती विष्णु पाठकें आपल्या मूळपुरुषास कन्यादानसमई दिल्हेया आहेती वृती पाच बिता।

| | |
|---|---|
| जोतीश देहे २ दोन | का। कोल्हा- |
| १ मौजे बायवडे | पूर जोतीष |
| १ उचगाव | व ग्रामउपा- |
| —— | द्धीक व धर्मा- |
| २ | धिकरण ऐसे |
| | तीन |

ऐसे दान दिल्हे असेती ह्मणऊन बोलिले. त्यावरी सभासद बोलिले कीं दानपत्र आणून दाखविणें. त्यावरी जोइसी मजकूर बोलिले कीं रोज २ दोनीने दानपत्र आणून दाखऊन. त्यावरी दोनी दिवसानी दानपत्राची तालीक आणून दाखविली. असलपत्र नाही तालीक मात्र दाखविली. व बोलिले जें गयाभट आपले मुतालीक त्यापासून धर्माधिकरण घेतले

पद्म नामी भट धर्माधिकरणी बोलिलें जें आपलें धर्माधिकरण आपला मूळ पुरुष अच्युतभट त्याची स्त्री पोमाई त्यास ईश्वरभट सासरे तेंही आपले धर्माधिकरण कन्येस दिधले तधींपासून धर्माधिकरण आपले वडीलांचे वडील खात एताती. त्यांहीमध्यें धर्माधिकरणाविषयीं परिकीय उभे राहिलें होतें. त्यासी हि वेवाद सांगीतला असे. व आमचे वडीलीं गयावळाशी वेवाद सांगीतला असे त्यावरी जोइसी मजकुराची साक्षी असे व जोइसी मजकुरांत तीघांत जोतीषाविषयीं वेव्हार जाहाला होता त्या पत्रावरी आमचे वडीलांची साक्षी असे. व जोइसी मजकूर पांच वृती आपल्या ह्मणताती तरी मौंज बायवडेचे जोतीश वेदांती खाताती व मौजे उचगांवीचे जोतीश मौजे वाळवडेकर खाताती. व ग्रामउपाधीक कठीकर खाताती. व जोतीश पाठक व एकोंडीकर व माहेकर जोतीश खाताती व धर्माधि-

असे. ऐसीयास दोनी तकरीरा करण माझी वृती आमचे आह्मी
बोलिले असे भक्षितों ह्मणऊन बोलिले